# महाराष्ट्र शासन

**क्र.भानिका १२०८/ प्र.क्र.१७०/ पापु-०७**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
Email ID:WSSD_DO7_RPOLICY@maharashtra.gov.in
wssdpapu07@rediffmail.com
दु.क्र. २२८४ ६४६३, २२७९ ३००९/ ३३७५
फॅक्स क्र. २२८२ ८१२९,
दिनांक : २३ सप्टेंबर, २००८

प्रति,
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद (सर्व)**

**विषयः भारत निर्माण कार्यक्रम**
आर्थिक वर्ष २००८-०९, वार्षिक कृती आराखडयासाठीचे सुक्ष्म नियोजन.
संदर्भ : शासन पत्र समक्रमांक दिनांक ९ सप्टेंबर, २००८.

विषयाधिन प्रकरणी, संदर्भाधिन शासन पत्रान्वये दिलेल्या सूचना अधिक्रमीत करुन पुढील प्रमाणे नव्याने सूचना देण्यात येत आहेत :

सन २००५ पासून केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी भारत निर्माण कार्यक्रम आपण राज्यात राबवित आहोत. दिनांक ०१ एप्रिल, २००५ रोजी पिण्याच्या पाण्याची समस्याग्रस्त असलेली गावे / वाडया या कार्यक्रमांतर्गत मार्च, २००९ अखेर हाताळावयाची आहेत. यासाठी प्रत्येक जिल्हयाने CAP-९९ व सन २००३ च्या पेयजल सर्वेक्षणाच्या यादया आधारभूत मानून, दिनांक ३१ मार्च, २००५ पर्यंत हाताळलेली गावे /वाडया वजा करता उर्वरित गावे / वाडया भारत निर्माण कार्यक्रमासाठी निश्चित करणे अनिवार्य होते. त्यानुसार आपण भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत हाताळावयाच्या गावे / वाडयांची माहिती (Target data entry ) केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर डिसेंबर, २००६ पर्यंत नोंदविली आहे.

२. नुकत्याच झालेल्या माहिती तपासणी अभियानामध्ये (Data validation campaign) प्रत्येक जिल्हयाच्या माहितीमध्ये विसंगती आढळून आली आहे. अनेक FC गावात पुन्हा योजना घेणे, काही गावे NC असूनही Website वर न येणे, अनेक गावे दोनदा यादीत असणे इत्यादी त्रुटी आढळलेल्या आहेत. तसेच २००५-०६ पासून हाताळण्यात आलेल्या अनेक गावांचे online reporting न झाल्याने कामे होऊनही भारत निर्माण कार्यक्रमाचे साध्य कमी दिसते.

३. उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, भारत निर्माण कार्यक्रमाचा आर्थिक वर्ष २००८-०९ चा वार्षिक कृती आराखडा निश्चित करीत असताना, सुक्ष्म नियोजन करून केवळ उद्दिष्टीत गावे /वाडयांचाच प्राथम्यक्रम ठरविण्याची गरज निर्माण झालेली आहे. त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत :-

(१) आपल्या जिल्हयाने केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर नमूद केलेल्या उद्दिष्टीत गावे / वाडयांची नोंद केंद्र शासनाकडून CAP-९९ व दुबार हाताळावयाच्या गावे / वाडया याप्रमाणे विभागण्यात आली आहे. ही मुख्य यादी (Base list) आपणास allbharatnirman@rediffmail.com या इमेल आयडीवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यातील हिरव्या रंगाने दर्शविलेली गावे /वाडया आपण कृती आराखडयात घेतलेल्या आहेतच. मात्र, तपकिरी रंगाने दर्शविलेली गावे / वाडया मुळ यादीत असूनही आपण आर्थिक वर्ष २००८-०९ च्या कृती आराखडयात घेतलेल्या नाहीत. तपकिरी रंगाने दर्शविलेल्या (CAP-९९ व SLIP BLACK) गावे / वाडयांची दिनांक ०१ एप्रिल,२००८ ची स्थिती कृपया YSR वर तपासून पहावी. YSR मध्ये या गावे / वाडयांची स्थिती हाताळलेली (FC) अशी दर्शविली असल्यास, त्या गावे / वाडया कृती आराखडयात घेण्याची गरज नाही. मात्र, YSR मध्ये हया गावे /वाडया न हाताळलेल्या / अंशतः हाताळलेल्या (NC / PC) असतील तर त्या गावे / वाडयांची सविस्तर तपासणी व उपाययोजना निश्चित करून त्या गावे /वाडयांचा कृती आराखडयात पुढे दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार समावेश करावा लागेल.

(२) पाणी गुणवत्ता बाधित गावे / वाडयांचा ताळमेळ देखील या यादीमध्ये घेण्यात आलेला आहे. ज्या गावे /वाड्या गुणवत्ता बाधित गावांच्या यादीत आहेत व कॅप-९९ व स्लिप बॅकच्या यादीत देखील आहेत, अश्या गावे / वाडया गुणवत्ता बाधित गावे /वाड्यांच्या यादीमध्येच ठेवावीत व कॅप-९९ व स्लिप बॅक गावांच्या यादीतून ती तात्काळ वगळावीत.

(३) दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी ज्या गावे/वाडया/वस्त्यांची मूळ यादी (Base List) राज्य शासनातर्फे केंद्र शासनास सादर करण्यात आली होती, त्यातील ज्या गावे/वाडया/वस्त्या मागील ३ वर्षात हाताळलेल्या आहेत, त्या वगळून, उर्वरित गावे / वाडया / वस्त्यांचाच समावेश सन २००८-०९ च्या कृती आराखडयात करण्यात यावा. या मूळ यादीत (Base List) समाविष्ट नसलेल्या इतर कोणत्याही गावे / वाडया / वस्त्यांचा समावेश कृती आराखडयात करु नये याची गांभिर्याने दखल घ्यावी.

भारत निर्माण कार्यक्रमाचा आर्थिक वर्ष २००८-०९ चा कृती आराखडा ठरविण्यासाठी मुळ यादीतील गावे / वाडयांचा प्राथम्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

**प्राथम्य क्रम-१:** मागील तीन वर्षातील टंचाई कृती आराखडयात समाविष्ट असलेली व टंचाई उपाययोजना केलेली CAP-९९ मधील NC /PC गावे / वाडया.

**प्राथम्य क्रम-२:** मागील तीन वर्षातील टँकरग्रस्त असलेली दुबार हाताळावयाची गावे / वाडया.

**प्राथम्य क्रम-३:** मागील तीन वर्षातील टँकरग्रस्त असलेली पाणी गुणवत्ता बाधित गावे /वाडया.

**प्राथम्य क्रम-४:** CAP-९९ मधील उर्वरित NC/PC गावे /वाडया.

**प्राथम्य क्रम-५:** उर्वरित पाणी गुणवत्ता बाधित गावे / वाडया.

**प्राथम्य क्रम-६:** उर्वरित दुबार हाताळावयाची गावे /वाडया.

(४) प्राथम्य क्रम १,२ व ३ मधील गावे /वाडयांत जर टंचाई आराखडयाप्रमाणे कायम स्वरूपी योजना उदा. पूरक/तातडीची पाणी पुरवठा योजना किंवा विंधण विहिरी घेण्यात आल्या असतील व त्यामुळे या गावे/वाडयांना किमान निकषानुसार पिण्याचे पाणी उपलब्ध होत आहे. तसेच, वरील गावे / वाडयांचे प्रस्ताव आता येत नसल्यास, अशा गावे /वाडयांची माहिती प्राप्त करून व तेथे पुरेसे पाणी उपलब्ध असल्यास अशा गावे/वाडया, तसेच गेल्या तीन वर्षात टंचाई आराखडयात ज्या गावे/वाडयांचा समावेश झालेला नाही, त्यामुळे तेथे कोणतीही टंचाई उपाययोजना घेतलेली नाही व आता अशा गावांचे प्रस्ताव देखील येत नसतील तर अशा सर्व गावे/वाडया FC म्हणून जाहीर कराव्यात व कृती आराखडयातून वगळण्यात याव्यात.

(५) प्राथम्य क्रमानुसार गावे /वाडया हाताळीत असताना या गावांसाठी किमान खर्चाची (Least cost solution) व्यवहार्य उपाययोजना निश्चित करण्यात यावी. ज्या गावे /वाडयांना शासनाच्या मानकानुसार जितक्या कमी प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध होत आहे, तितक्याच क्षमतेची उपाययोजना प्रस्तावित करण्यात यावी.

(६) ज्या गावे / वाड्या न हाताळलेल्या (NC) यादीत असतील व प्रत्यक्ष पाहणीच्या वेळी, या गावे /वाड्यांमध्ये शासन मानकानुसार पिण्याच्या पाण्याच्या पुरेशा सोयी उपलब्ध असल्याचे भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने प्रमाणित केले असेल, मात्र ग्रामपंचायतीने तशा प्रकारचा ठराव दिलेला नसेल, व कोणतीही योजना देखील प्रस्तातित केली नसेल, तर अशी गावे हाताळण्यात आल्याचे दर्शविण्यात यावे.

(७) Cap-९९ व दुबार हाताळवयाच्या अनेक गावे /वाडयांचे प्रस्ताव अनेकदा पाठपुरवठा करूनही ग्रामपंचायतीकडून येत नाहीत. अशा गावे /वाडयात उपलब्ध असलेल्या पाणी पुरवठा व्यवस्थेची सविस्तर माहिती ग्रामसेवकांकडून घेऊन जर तेथे किमान निकषानुसार पिण्याचे पाणी उपलब्ध होत असेल तर अशा गावे / वाडया FC म्हणून जाहीर कराव्यात.

(८) Cap-९९ वर्गवारीतील ज्या गावे / वाडया भारत निर्माण कार्यक्रमाच्या चालू आर्थिक वर्षाच्या कृती आराखडयामध्ये आहेत. अशा गावे /वाडयांनी आपले प्रस्ताव, विहीत लोकवर्गणी जमा केल्याच्या पुराव्यासह कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३० सप्टेंबर, २००८ पर्यंत संबंधित यंत्रणेकडे सादर करावेत. अन्यथा अशी गावे/वाडया FC म्हणून जाहीर कराव्यात.

(९) ज्या न हाताळलेल्या गावे /वाडयांमध्ये नव्याने पाणी पुरवठा योजना घेणे शक्य / व्यवहार्य नसेल मात्र, अशा ठिकाणी परिणामकारक स्थायी स्वरूपाच्या पाऊस पाणी संकलन योजना, भूजल पुनर्भरण उपाययोजना घेणे शक्य /व्यवहार्य असेल अशा गावे /वाडयांची यादी तयार करून तेथे

शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत योग्य ती उपाययोजना करावी व त्याप्रमाणे कृती आराखडयात नमूद करावे.

(१०) दुबार हाताळावयाच्या गावे /वाडयांमध्ये ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत कमी पडल्याने वा आटल्याने शासन मानकानुसार पिण्याचा पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही, अशा गावे/वाडयांमध्ये शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत स्त्रोत बळकटीकरणाची कामे आधी हाती घेण्यात यावीत. त्यानंतरच या गावे /वाडयांसाठी पिण्याच्या पाण्याच्या अन्य उपाययोजना प्रस्तावित करण्यात याव्यात.

(११) ज्या गावे/वाडया १ ते ५० टक्के पर्यंत पाणी गुणवत्ता बाधित आहेत, अशा गावे /वाडयांमध्ये गुणवत्ता बाधित स्त्रोत व सुरक्षित स्त्रोत याबाबत ग्रामस्थांना फलकांद्वारे योग्य माहिती देण्यात यावी. या सुरक्षित स्त्रोतांद्वारे शासन मानकानुसार किमान पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसेल तरच अन्य किमान खर्चाची उपाययोजना प्रस्तावित करण्यात यावी.

(१२) ज्या गावे/वाडया ५१ ते १०० टक्के पर्यंत पाणी गुणवत्ता बाधित आहेत, अशा गावे /वाडयांचे प्रस्ताव तयार करून, पाणी गुणवत्ता उप अभियान कार्यक्रमात समाविष्ट करण्याकरिता दिनांक ३० सप्टेंबर, २००८ पर्यंत शासनाकडे पाठवावेत. तोपर्यंत वर्धितवेग कार्यक्रमातून अशी कामे सुरु करावीत.

(१३) ज्या गावे / वाडयांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे, मात्र जी गावे भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत कोणत्याही वर्गवारी येत नाहीत, अशा गावे /वाडयांसाठी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत तसेच शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत उपाययोजना मंजूर करण्यात याव्यात.

(१४) ज्या गावे /वाडया भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत कोणत्याही वर्गवारी येत नाहीत, मात्र अशा गावांमध्ये पाणी पुरवठा योजना प्रगती पथावर आहेत, अशा ठिकाणी ज्या उपांगांचे काम चालू असेल ते पूर्ण करून पुढील काम थांबविण्यात यावे. उदा. स्त्रोतांचे काम पूर्ण करून योजना बंद करावी. उर्ध्व / गुरुत्व वाहिनीचे काम सुरु असल्यास ते पूर्ण करून योजनेचे काम थांबविण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत भारत निर्माण कार्यक्रमाच्या यादी बाहेरील नवीन गावे / वाडया यावर्षी हाताळण्यात येणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी.

(१५) जलस्वराज्य, आपलं पाणी व स्वजलधारा या कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील योजनांची अंमलबजावणी सुरु ठेवावी. परंतु या कार्यक्रमांतर्गत नव्याने मंजूर करावयाच्या योजना या भारत निर्माण कार्यक्रमाच्या कृती आराखड्यातीलच असाव्यात.

(१६) अनेक गावे/वाडयांत विंधण विहीरी घेऊन किंवा लघु पाणी पुरवठा योजना घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविता येतो. मात्र, अशा योजना स्वीकारल्यास गाव/वाडी नळ योजनेपासून वंचित राहील म्हणून ग्रामपंचायती या उपाययोजना मान्य करीत नाहीत. भारत निर्माण

कार्यक्रमाच्या यादीत समाविष्ट असलेल्या गावे/वाडयांना मार्च २००९ पर्यंत किमान ४० लिटर्स दरडोई दरदिवशी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे हे उद्दिष्ट आहे. मार्च २००९ नंतर केंद्र पुरस्कृत वर्धितवेग कार्यक्रम व महाजल कार्यक्रम यापुढेही सुरु राहणार आहेत. त्यामुळे अन्य गावे/वाडयांचा विचार पुढील वर्षी करता येणे शक्य आहे. ही बाब जिल्हा व ग्रामस्तरावरील पदाधिका-यांच्या निदर्शनास आणण्यात यावी. या स्पष्टीकरणानंतरही या गावे/वाडया किमान खर्चाची उपाययोजना घेण्यास तयार नसतील तर, अशा गावे/वाडया FC म्हणून जाहीर कराव्यात.

(१७) आपल्या जिल्ह्यास वरीलप्रमाणे उपलब्ध करून दिलेल्या मुळ यादीतील गावे / वाड्यांचाच अंतर्भाव on line data entry करताना करावा.

(१८) अशा प्रकारे, सन २००८-०९ या वर्षासाठी भारत निर्माण कार्यक्रमाचा कृती आराखडा तयार करण्यात यावा. तथापि, कोणत्याही परिस्थितीत, Data validation करून दिलेल्या Base list च्या बाहेरील गावे / वाड्या या कृती आराखड्यात समाविष्ट करण्यात येणार नाहीत, याची गांभिर्याने नोंद घ्यावी. वरीलप्रमाणे प्राधान्यक्रमानुसार गावे /वाड्या हाताळीत असतानाच शासन परिपत्रक दि.१८ मार्च,२००८ अन्वये दिलेल्या सूचनांचे देखील पालन करण्यात यावे.

४. उपरोक्त मार्गदर्शक सूचनांनुसार आर्थिक वर्ष २००८-०९ चा कृती आराखडा तयार करून तो दिनांक ३० सप्टेंबर, २००८ पर्यंत राज्यस्तरीय भारत निर्माण कक्षास सादर करण्यात यावा.

सही/-

**(अजित कुमार जैन)**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
मुख्य अभियंता, भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई.
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व विभागीय आधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७